RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ८] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २५-मार्च ३, २०२१/फाल्गुन ६-१२, शके १९४२ [पृष्ठे १२ किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

### कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्था/बी-२/७०६/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा | अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | श्रीमती एस. एस. मतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग १, रत्नागिरी. | ७९ दिवस अर्जित रजा. | दिनांक ४ फेब्रुवारी २०२१ ते दिनांक ६ फेब्रुवारी २०२१ पर्यंतची तीन दिवसांची अर्जित रजा. | दिनांक ७ फेब्रुवारी २०२१ रोजीची सुट्टी दिनांक ३ फेब्रुवारी २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत | श्री. एन. सी. पवार २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग १, रत्नागिरी. |

रजेवरून परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्याचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

संबधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना दयाव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ३ फेब्रुवारी २०२१.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

### कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्था/बी-२/४८६/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करीत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित रजा | अर्जित रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | श्री. जी. जे. श्रीसुंदर, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड. | १६४ दिवस अर्जित रजा. | दिनांक २७ जानेवारी २०२१ ते दिनांक ३० जानेवारी २०२१ पर्यंत ०४ दिवस अर्जित रजा. | दिनांक २६ जानेवारी २०२१ दिनांक ३१ जानेवारी २०२१ रोजीच्या सुट्ट्या. दिनांक २६ जानेवारी २०२१ रोजीचे ध्वजवंदनाचे कार्यक्रमानंतर पासून ते दिनांक १ फेब्रुवारी २०२१ चे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत. | श्री. अे. अेस. आवटे, जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, खेड. |

रजेवरून परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुर्ननियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्याचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणूकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २२ जानेवारी २०२१.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/मनाई आदेश/वशी-२४/२०२०.— ज्याअर्थी, उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये वेगवेगळया राजकीय पक्ष/संघटनांकडुन आपल्या विविध मागण्यांसाठी विविध ठिकाणी मोर्चा, रॅली, धरणे, उपोषण इत्यादी प्रकारची आंदोलने करण्यात येत असतात. तसेच सध्या मराठा आरक्षणाबाबत मा.न्यायालयाने स्थगिती दिल्याने मराठा संघटनांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात विविध राजकीय पक्ष/संघटनेचे नेते, महत्त्वाच्या, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे दौरे असतात. सदरवेळी विरोधक पक्ष/संघटनांकडून, नाराज घटकांकडून निदर्शने करण्याची शक्यता नाकारता येत नाही ;

आणि ज्याअर्थी, सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने रूग्ण संख्येत वाढ होत असून दिनांक ३० नोव्हेंबर २०२० रोजी गुरूनानक जयंती व दिनांक ६ डिसेंबर २०२० रोजी महापरीनिर्वाण दिन साजरा होणार आहे. तसेच सदर दिवशो बाबरी मशिद पतनच्या अनुषंगाने हिंदु बांधवांकडून विजय दिन व मुस्लीम बांधवांकडून निषेध दिन पाळण्याची शक्यता आहे. एकंदरीत ठाणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रातील गणेशपुरी, भिवंडी तालुका, पडघा, शहापुर, कसारा, वासिंद, किन्हवली, मुरबाड, कल्याण तालुका, कुळगाव व टोकावडे पोलीस स्टेशन असे एकुण ११ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रामध्ये शांतता व कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक २२ नोव्हेंबर २०२० रोजीचे ००-०० वा. ते दिनांक ६ डिसेंबर २०२० रोजीचे २४-००. वा. पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) मनाई आदेश लागू करणेस उक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त नमूद परिस्थितीनुसार ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी, राजेश ज. नार्वेकर, ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक २२ नोव्हेंबर २०२० रोजीचे ००.०० वाजेपासुन ते दिनांक ६ डिसेंबर २०२० रोजीचे २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) खालील बाबीसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

(१) शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे, लाठ्या अथवा काठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

(५) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(६) यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्चे, हावभाव करणे, सोंग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(७) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी.

सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेऊन काढलेल्या मिरवणूकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज दिनांक २६ नोव्हेंबर २०२० रोजी माझे सही शिक्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**

ठाणे. जिल्हादंडाधिकारी, ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/परीक्षा/वशी-१८/२०२०.— ज्याअर्थी, उपोदघातातील अनुक्रमांक १ वरील पत्राने कळविल्यानुसार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोंकण विभागीय मंडळातर्फे दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते दिनांक १० डिसेंबर २०२० या कालावधीत इयत्ता १२ वी (एचएससी) इयत्ता १० वी (एसएससी) च्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. ठाणे ग्रामिण जिल्ह्यात एकुण ०२ परिरक्षण केंद्र असून इयत्ता १२ वी च्या परीक्षांसाठी ०३ केंद्र व १० वी च्या परीक्षांसाठी ०१ केंद्र नेमण्यात आलेली आहेत. उपरोक्त परीक्षा काळामध्ये परीरक्षण केंद्र, परीक्षा केंद्र/ उपकेंद्र व परिसरात काही असामाजिक तत्वे परिक्षा प्रक्रियेत गैर व्यवहार व बाधा निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर, फॅक्स सेंटर, टेलीफोन बुथ, कम्युनिकेशन सेंटर या ठिकाणाहून गैरव्यवहार होण्याची शक्यता असून बेकायदेशिर जमाव जमून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अगर शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता या अपप्रक्रियाना प्रतिबंध घालणे जरूरीचे आहे ;

आणि ज्याअर्थी, परीक्षा केंद्रावर शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परीसरात अनावश्यक लोकांची गर्दी होवू न देणे व परीक्षा प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने योग्य ते प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे क्रमप्राप्त वाटते.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी, राजेश ज. नार्वेकर, ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील १० वी व १२ वी च्या परीक्षा केंद्राच्या ठिकाणी, मुख्य केंद्र व उप केंद्रासाठी वरील परीक्षा नियोजित तारखांकरीता प्रस्तावित करण्यात येत असलेल्या सर्व परीक्षा केंद्र, मुख्य केंद्र व उप केंद्राच्या इमारतीसमोर व सभोवताच्या १०० मीटर अंतराच्या आत खालील व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तीस प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

(१) पर्यवेक्षक व परीक्षा प्रक्रिया संबधीत अधिकारी/कर्मचारी

(२) परीक्षार्थी

(३) अंध व अपंग परीक्षार्थी यांचेबरोबर आलेले नातेवाईक

(४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्ती.

सदरचा आदेश ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रे व मुख्य व उप केंद्राच्या सभोवतालच्या परीसरात दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजीचे ००-०० वाजेपासून ते दिनांक १० डिसेंबर २०२० रोजीचे २४-०० वाजे पर्यत अंमलात राहील. त्यानंतर तो संपुष्टात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक १८ नोव्हेंबर २०२० रोजी माझे सही शिक्याने दिलेला आहे.

**राजेश ज. नार्वेकर,**
जिल्हादंडाधिकारी, ठाणे.

ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/मनाई आदेश/वशी-०३/२०२०.— ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या राजकीय पक्ष/संघटनांकडून आपल्या विविध मागण्यांसाठी विविध ठिकाणी मोर्चा, रॅली, धरणे, उपोषण इत्यादी प्रकारची आंदोलने करण्यात येत असतात. तसेच सध्या मराठा आरक्षणाबाबत मा. न्यायालयाने स्थगिती दिल्याने मराठा संघटनांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात विविध राजकीय पक्ष/संघटनेचे नेते, महत्त्वाच्या, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे दौरे असतात. सदरवेळी विरोधक पक्ष/संघटनांकडून, नाराज घटकांकडून निदर्शने करण्याची शक्यता नाकारता येत नाही ;

आणि ज्याअर्थी, सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने रुग्ण संख्येत वाढ होत असून दिनांक १२ नोव्हेंबर २०२० ते दिनांक १६ नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये दिवाळी साजरी होत आहे. तसेच दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजी छटपूजा हा सण साजरा होणार आहे. एकंदरीत ठाणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रातील गणेशपुरी, भिवंडी तालुका, पडघा, शहापूर, कसारा, वासिंद, किन्हवली, मुरबाड, कल्याण तालुका, कुळगाव व टोकावडे पोलीस स्टेशन तसेच मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरारोड, काशिमिरा, नयानगर, भाईंदर, नवघर व उत्तन असे एकूण १७ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रामध्ये शांतता व कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक ६ नोव्हेंबर २०२० रोजीचे ००-०० वा. ते दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजीचे २४-०० वा. पर्यत (दोन्ही दिवस धरून) मनाई आदेश लागू करणेस उक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी उपरोक्त नमूद परिस्थितीनुसार ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी राजेश ज. नार्वेकर, ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक ६ नोव्हेंबर २०२० रोजीचे ००.०० वाजेपासून ते दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजीचे २४-०० वाजेपर्यत (दोन्ही दिवस धरून) खालील बाबींसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

(१) शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे, लाठ्या अथवा काठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

(५) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(६) यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्त्वे, हावभाव करणे, सोंग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(७) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी.

सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेऊन काढलेल्या मिरवणूकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी-काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज दिनांक ५ नोव्हेंबर २०२० रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**
जिल्हादंडाधिकारी ठाणे.

ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/मनाई आदेश/वशी-२३/२०२०.— ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या राजकीय पक्ष/संघटनांकडुन आपल्या विविध मागण्यांसाठी विविध ठिकाणी मोर्चा, रॅली, धरणे, उपोषण इत्यादी प्रकारची आंदोलने करण्यात येत असतात. तसेच सध्या मराठा आरक्षणाबाबत मा.न्यायालयाने स्थगिती दिल्याने मराठा संघटनांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात विविध राजकीय पक्ष/संघटनेचे नेते, महत्त्वाच्या, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे दोरे असतात. सदरवेळी विरोधक पक्ष/संघटनांकडून, नाराज घटकांकडून निदर्शने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने रुग्ण संख्येत वाढ होत आहे. ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये दि. २५ डिसेंबर २०२० रोजी ख्रिश्चन बांधवांचा नाताळ सण साजरा होणार असून नाताळ सणाच्या अनुषंगाने प्रार्थना (मिसा) कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच दिनांक २९ डिसेंबर २०२० रोजी श्रीदत्त जयंती उत्सव साजरा होणार असून त्यानिमित्त पूजा/अर्चा, भजन/कीर्तन, भंडारा या कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे, तसेच दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी सरते वर्ष २०२० ला निरोप देण्यासाठी व नूतन वर्ष सन २०२१ चे स्वागत करण्यासाठी सर्व जनता आपल्या कुटुंबियांसमवेत हॉटेल, मॉल्स, रिसॉर्टस, फार्म हाऊस, समुद्र किनारे इत्यादी ठिकाणी एकत्र येतात. त्या निमित्ताने विविध करमणुकीचे, सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन होण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, एकंदरीत ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये शांतता व कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दि. २३ डिसेंबर २०२० रोजीचे ००.०० वा. ते दि. ६ जानेवारी २०२१ रोजीचे २४-०० वा.पर्यंत (दोन्ही दिवस धरून) मनाई आदेश लागू करणेस उक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी उपरोक्त नमूद परिस्थितीनुसार ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणन खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी राजेश ज. नार्वेकर, ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दि. २३ डिसेंबर २०२० रोजीचे ००.०० वाजेपासून ते दि. ०६ जानेवारी २०२१ रोजीचे २४-०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) खालील बाबोसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

(१) शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे, लाठ्या अथवा काठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

(५) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(६) यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्त्वे, हावभाव करणे, सोंग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(७) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी.

सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेऊन काढलेल्या मिरवणूकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी-काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज दिनांक २३ डिसेंबर २०२० रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**

ठाणे. जिल्हादंडाधिकारी ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/आकाश कंदिल/वशी-०४/२०२०.—– ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी उपोद्घातातील अ. क्र. १ वरील पत्राने कळविल्यानुसार सध्या सुरू असलेल्या दिवाळी उत्सवाच्या अनुषंगाने जनतेकडून आकाश कंदील प्रज्वलित करून हवेत सोडण्यात येत असतात. परिणामी सदरचे पेटते कंदिल जमिनीवर येऊन एखादी अनुचित गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता कंदील प्रज्वलित करून हवेत सोडण्यात येणाऱ्या आकाश कंदीलांच्या (Flying Lantern) उडविण्यावर, विक्रीवर व साठा करणाऱ्यांवर बंदी घालणेकरिता संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये यांनी विनंती केली आहे.

ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी त्यांचे पत्रानुसार कळविण्यानुसार ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात दिनांक १२ नोव्हेंबर २०२० ते दिनांक १६ नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये प्रज्वलीत आकाश कंदिल हवेत सोडण्यावर (उडविण्यावर), विक्री करणे व साठा करण्यावर ठाणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश लागू करणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

त्याअर्थी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडील पत्र जा.क्र जिविशा/टे-१३/दिपावली/मनाई आदेश-१४४/२०२०-३४०६, दिनांक ३ नोव्हेंबर २०२० रोजी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मी, राजेश ज. नार्वेकर, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे मला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण क्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक १२ नोव्हेंबर २०२० ते दिनांक १६ नोव्हेंबर २०२० या कालावधीत प्रज्वलीत आकाश कंदिल हवेत सोडण्यावर (उडविण्यावर), विक्री करणे व साठा करण्यावर बंदी घालीत आहे. सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास त्यांचेवर फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये कठोर कारवाई करणेत येईल.

सदरचा आदेश दिनांक ५ नोव्हेंबर २०२० रोजी माझे सही व शिक्क्याने दिलेला आहे.

**राजेश ज. नार्वेकर,**
जिल्हादंडाधिकारी,
ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/मनाई आदेश/वशी-०८/२०२०.— ज्याअर्थी, उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये वेगवेगळया राजकीय पक्ष/संघटनांकडून आपल्या विविध मागण्यांसाठी विविध ठिकाणी मोर्चा, रॅली, धरणे, उपोषण इत्यादी प्रकारची आंदोलने करण्यात येत असतात. तसेच सध्या मराठा आरक्षणाबाबत मा.न्यायालयाने स्थगिती दिल्याने मराठा संघटनांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात विविध राजकीय पक्ष/संघटनेचे नेते, महत्त्वाच्या, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे दौरे असतात. सदरवेळी विरोधक पक्ष/संघटनांकडून, नाराज घटकांकडून निदर्शने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने रुग्ण संख्येत वाढ होत आहे.

आणि ज्याअर्थी, एकंदरीत ठाणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रातील गणेशपुरी, भिवंडी तालुका, पडघा, शहापुर, कसारा, वासिंद, किन्हवली, मुरबाड, कल्याण तालुका, कुळगाव व टोकावडे पोलीस स्टेशन असे एकूण ११ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रामध्ये शांतता व कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजीचे १२-०० वा. ते दिनांक २२ डिसेंबर २०२० रोजीचे १२-०० वा. पर्यत (दोन्ही दिवस धरुन) मनाई आदेश लागू करणेस उक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त नमूद परिस्थितीनुसार ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी, राजेश ज. नार्वेकर, ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजीचे १२-०० वाजेपासून ते दिनांक २२ डिसेंबर २०२० रोजीचे १२-०० वाजेपर्यत (दोन्ही दिवस धरून) खालील बाबीसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

(१) शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे, लाठ्या अथवा काठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

(५) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(६) यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्वे, हावभाव करणे, सोंग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(७) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी.

सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेऊन काढलेल्या मिरवणुकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**
जिल्हादंडाधिकारी,
ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/मनाई आदेश/वशी-०६/२०२१.— ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये वेगवेगळया राजकीय पक्ष/संघटनांकडून आपल्या विविध मागण्यांसाठी विविध ठिकाणी मोर्चा, रॅली, धरणे, उपोषण इत्यादी प्रकारची आंदोलने करण्यात येत असतात. तसेच सध्या मराठा आरक्षणाबाबत मा.न्यायालयाने स्थगिती दिल्याने मराठा संघटनांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात विविध राजकीय पक्ष/संघटनेचे नेते, महत्त्वाच्या, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे दौरे असतात. सदरवेळी विरोधक पक्ष/संघटनांकडून, नाराज घटकांकडून निदर्शने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने रुग्ण संख्येत वाढ होत आहे. माहे एप्रिल, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला असून दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान व दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. त्या अनुषंगाने ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील १२६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका पार पडणार आहेत.

आणि ज्याअर्थी, एकंदरीत ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक ७ जानेवारी २०२१ रोजीचे १२-०० वा. ते दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजीचे १२-०० वा. पर्यत (दोन्ही दिवस धरून) मनाई आदेश लागू करणेस उक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त नमूद परिस्थितीनुसार ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी राजेश ज. नार्वेकर, ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक ७ जानेवारी २०२१ रोजीचे १२-०० वाजेपासून ते दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजीचे १२-०० वाजेपर्यत (दोन्ही दिवस धरून) खालील बाबीसाठी मनाई आदेश लागू करीत आहे.

(१) शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे लाठ्या अथवा काठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

(५) सार्वजनिक रीतीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(६) यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्वे, हावभाव करणे, सोंग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(७) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी.

सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेऊन काढलेल्या मिरवणुकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज दिनांक ८ जानेवारी २०२१ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**
जिल्हादंडाधिकारी ठाणे.

ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/निवडणूक/शस्त्र/वशी-०६/२०२१.— ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी उपोद्घातील अ.क्र.१ वरील पत्राने कळविल्यानूसार मा.राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८, दिनांक ११ डिसेंबर २०२० अन्वये माहे एप्रिल २०२० व डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकींचा कार्यक्रम जाहिर झालेला असून ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील गणेशपुरी पो. स्टेशन ०८, भिवंडी तालुका पो.स्टेशन १४, पडघा पो. स्टेशन १८, शहापूर पो. स्टेशन ०२, किन्हवली पो. स्टेशन ०३, मुरबाड पो. स्टेशन-४४, कल्याण तालुका पो. स्टेशन-१९ व कुळगाव पो. स्टेशन १८ याप्रमाणे एकूण १२६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झालेल्या आहेत, जाहीर झालेल्या कार्यक्रमानुसार निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजी मध्यरात्री १२-०० वाजलेपासुन आचार संहिता लागु झाली असून दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान, दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी मतमोजणी व दिनांक २१ जानेवारी २०२१ रोजी निवडणूक निकालाची अधिसुचना प्रसिध्द होणार आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे ग्रामीण जिल्ह्यात यापुर्वी वेगवेगळ्या पक्ष/ संघटनांमध्ये राजकीय स्पर्धेपोटी वादविवाद होऊन वेगवेगळ्या निवडणुकीच्या अनुषंगाने दखलपात्र/अदखलपात्र स्वरूपाचे गुन्हे दाखल झालेले आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये आपसांत भांडण-तंटे होऊन हातघाईवर येण्याची तसेच अशा प्रसंगी एखादया गटाकडून/व्यक्तीकडून शस्त्राचा दुरूपयोग होऊन गंभीर परिस्थीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या करिता ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूक असणाऱ्या पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात शस्त्र परवानाधारक यांनी शस्त्रांची ने-आण करण्यास, जवळ बाळगण्यास प्रतिबंधात्मक आदेश लागू करणेबाबत उक्त संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी राजेश ज. नार्वेकर, जिल्हादंडाधिकारी, ठाणे मला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून ठाणे जिल्ह्यातील गणेशपुरी पो. स्टेशन-०८, भिवंडी तालुका पो.स्टेशन -१४, पडघा पो. स्टेशन -१८, शहापूर पो.स्टेशन-०२, किन्हवली पो.स्टेशन -०३, मुरबाड पो. स्टेशन-४४, कल्याण तालुका पो.स्टेशन-१९ व कुळगाव पो.स्टेशन-१८ या ग्रामपंचायत निवडणूक असणाऱ्या पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात बँक संरक्षण, स्पोर्ट, ज्वेलर्स व्यापारी, पेट्रोलपंप यांना वगळून उर्वरित शस्त्र परवानाधारकांना शस्त्र ताब्यात ठेवणे, ने आण करणे, जवळ बाळगण्यास मनाई करणेत येत आहे. तसेच ज्या शस्त्र परवानाधारकांना सूट दिली आहे. त्यांनी आपली शस्त्रे निवडणुकीच्या कोणत्याही कार्यक्रमादरम्यान जवळ बाळगु नयेत.

सदरचा आदेश ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस ठाण्याचे हद्दीत निवडणूक क्षेत्रातील निवडणुकीच्या परिसरात दिनांक ५ जानेवारी २०२१ रोजी ००-०० वा. पासुन ते दिनांक २१ जानेवारी २०२१ रात्री २४-०० वा. मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यत अंमलात राहील.

सदरचा आदेश आज दिनांक ८ जानेवारी २०२१ रोजी माझे सही शिक्याने दिला आहे.

**राजेश ज. नार्वेकर,**

ठाणे.

जिल्हादंडाधिकारी ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/निवडणूक/वशी-०६/२०२१.— ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी उपोद्घातील अ.क्र.१ वरील पत्राने कळविल्यानुसार मा.राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का ८, दिनांक ११ डिसेंबर २०२० अन्वये माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या फक्त सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजीपासून आचारसंहिता लागु करण्यात आलेली आहे. दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान व दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी मतमोजणी पार पडणार आहे. ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रमानुसार ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील गणेशपुरी पो.स्टेशन -०८, भिवंडी तालुका पो.स्टेशन -१४, पडघा पो. स्टेशन -१८, शहापूर पो.स्टेशन-०२, किन्हवली पो.स्टेशन -०३, मुरबाड पो.स्टेशन-४४, कल्याण तालुका पो.स्टेशन-१९ व कुळगाव पो.स्टेशन-१८ या प्रमाणे एकुण १२६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. सदर निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी व निवडणूक शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावी याकरीता तसेच काही असामाजिक तत्त्वे निवडणूक केंद्राच्या परिसरात तसेच निवडणूक प्रक्रीयेत गैर व्यवहार व बाधा निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर निवडणूक मतदान केंद्राच्या तसेच शहापूर व मुरबाड तालुक्यातील मतमोजणी/स्टॉंगरूम इमारतीच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात बेकायदेशीर जमाव जमवून निवडणूक प्रक्रियेत शांतता भंग करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अपप्रक्रियांना प्रतिबंध घालणे जरूरीचे आहे.

आणि ज्याअर्थी, त्याकरीता ग्रामपंचायत निवडणुकीतील मतदान केंद्र असलेल्या इमारतीच्या १०० मीटर परिसरात दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी ते दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी (मतदान प्रक्रिया संपे पर्यत) तसेच शहापूर व मुरबाड येथील मतमोजणी/स्टॉंगरूम इमारतीच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी ००-०० ते दिनांक २१ जानेवारी २०२१ रात्री २४-०० वा. पर्यत (निवडणूक प्रक्रिया संपेपर्यत) फौजदारी दंड प्रक्रिया संहितेचे कलम १४४ (१) अन्वये जमाव बंदी आदेश लागु करणेबाबत उक्त संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी **राजेश ज. नार्वेकर, जिल्हादंडाधिकारी, ठाणे** मला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून ठाणे जिल्ह्यातील सबंधीत पोलीस स्टेशनच्या हद्दीत निवडणूक क्षेत्रातील मतदान व मतमोजणीच्या इमारतीच्या १०० मीटर परिसरात खालील व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तीस प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

(१) नियुक्त केलेले निवडणूक निर्णय अधिकारी/निरीक्षक

(२) मतदार/मतमोजणी अधिकारी/कर्मचारी

(३) प्रत्येक उमेदवार त्यांचे सोबत एकच वेळी एकच निवडणूक प्रतिनिधी आणि मतदान/मतमोजणी प्रतिनिधी .

(४) निवडणुकीशी संबधीत कामावर असलेले अधिकारी/कर्मचारी

(५) मतदाराच्या कडेवर असलेले लहान मुले

(६) ज्या व्यक्तींस मदतीशिवाय चालता येत नाही. किंवा मत देता येत नाही. अशा अंध किंवा अपंग व्यक्तीला सोबत करणारी व्यक्ती.

सदरचा आदेश ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस ठाण्याचे हद्दीत निवडणूक क्षेत्रातील निवडणुकीच्या परिसरात दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी ००-०० वाजेपासुन ते दिनांक २१ जानेवारी २०२१ रात्री २४-०० वा. मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यत अंमलात राहील.

सदरचा आदेश आज दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी माझे सही शिक्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**
जिल्हादंडाधिकारी ठाणे.

ठाणे.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे-१/मनाई आदेश/वशी-२५/२०२१.— ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या राजकीय पक्ष/संघटनांकडुन आपल्या विविध मागण्यांसाठी विविध ठिकाणी मोर्चा, रॅली, धरणे, उपोषण इत्यादी प्रकारची आंदोलने करण्यात येत असतात. तसेच सध्या मराठा आरक्षणाबाबत मा.न्यायालयाने स्थगिती दिल्याने मराठा संघटनांकडून आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात विविध राजकीय पक्ष/संघटनेचे नेते, महत्त्वाच्या, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे दोरे अंसतात. सदरवेळी विरोधक पक्ष/संघटनांकडून, नाराज घटकांकडून निदर्शने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने रुग्ण संख्येत वाढ होत आहे.

आणि ज्याअर्थी एकंदरीत ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये शांतता व कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे व्हावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक २३ जानेवारी २०२१ रोजीचे ००-०० वा. ते दिनांक ७ फेब्रुवारी २०२१ रोजीचे २४-०० वा.पर्यत (दोन्ही दिवस धरून) मनाई आदेश लागू करणेस उक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये विनंती केली आहे.

त्याअर्थी उपरोक्त नमूद परिस्थितीनुसार ठाणे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्वत्र शांतता व सुव्यवस्था तसेच जनजीवन सुरळीत रहावे म्हणून खालील कृत्यास बंदी करण्यासाठी मी **राजेश ज. नार्वेकर,** ठाणे जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक २३ जानेवारी २०२१ रोजीचे ००-०० वाजेपासुन ते दिनांक ७ फेब्रुवारी २०११ रोजीचे २४-०० वाजेपर्यत (दोन्ही दिवस धरुन) खालील बाबींसाठी मनाई आदेश लागू करीत आहे :—

(१) शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे, लाठ्या अथवा काठ्या अथवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

(५) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

(६) यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्वे, हावभाव करणे, सोंग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे.

(७) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी.

सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेऊन काढलेल्या मिरवणुकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

सदरचा आदेश आज दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**राजेश ज. नार्वेकर,**

ठाणे. जिल्हादंडाधिकारी, ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.